# प्रकरण दुसरे

## ' माझ्या जल्माची चित्तरकथा ' व ' मिटलेली कवाडे ' मधून दिसून येणारे तत्कालिन सामाजिक व धार्मिक जीवन

## प्रकरण - दोन

### "माज्या जल्माची चित्तरकथा" व "मिटलेली कवाडे" मधून दिसून येणारी तत्कालीन सामाजिक धार्मिक जीवन ---

प्रस्तुत दोन्ही आत्मकथनामध्ये सन १९३१-३२ पासून ते जवळ जवळ ८०।८१ पर्यन्तच्या काळापर्यन्त दिसून येणाऱ्या समाज जीवनाचे दर्शन घडते. या काळातील दलित समाजाची अवस्था, मुख्यत्वेकरून स्त्री जीवनाची दु:खे चित्रित करत असतांना सवर्णांचा अस्पृश्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन कसा होता याचेही दर्शन घडते. या दलित लेखिकांनी स्वत:चे अनुभव व दलित स्त्रियांची दु:खे मांडत असतानाच संपूर्ण दलित समाजावर प्रकाश टाकला आहे. म्हणूनच दलित आत्मकथन हे एका व्यक्तीचे न राहता सर्व समाजाचे बनते हे जे वैशिष्टय सांगितले ते या आत्मकथनांना लागू पडते.

### (१) सवर्ण व अस्पृश्य संबंध ----

या दोन्ही आत्मकथनातून सवर्ण व अस्पृश्य यांच्या संबंधाचे विविध पदर पाहावयास मिळतात. हरिजनांच्याकडून अनेक स्वरुपाची कामे करून घेऊन यांना वागणूक कशी दिली जात होती याचे स्वच्छ चित्र यामध्ये पाहावयास मिळते.

खेडयातील महार हे बाराबलुतेदारापैकी एक. त्यांनी गावकीची घाण कामे करून सवर्णांची सर्वतोपरि सेवा करावी असा अलिखीत दण्डक सवर्णांनी निर्माण केला होता. काळवेळ न पाहता गावकीची कामे अस्पृश्यांच्याकडून करून घेतली जात. शांताबाई सांगतात, "खालच्या आळीचा किसना तात्या आला. तो आप्याला म्हणाला, "सका, गावात आज फौजदार आलाय. सवाल्याची सून हिरीत पडून मेली हुती. त्याचा तपास करायला फौजदार आलाया. सका, तुज्यावर आज जागलं आलीया. तू सांच्याला जागलीला जा" १

दलित समाजात जनजागृतीकरण्यासाठी डॉ.आंबेडकरांचे अनुयायी कोकणातील ब्राह्मण कुळात जन्मलेले पतीतपावनबुवा यांच्या कार्यक्रमाच्यावेळी इतर अनुयायांनी जे भाषण केले त्यातून गावकीच्या कामावर प्रकाश टाकला व त्यातील व्यथा प्रकट केल्या आहेत. खंडू पेटीवाला आपल्या भाषणात सांगतो, महार लोकांना गावचा पाटील कामासाठी मरेपर्यन्त राबवून घेतो. एखाद्या वेळेस घरचा पुरुष कामासाठी बाहेरगावी गेला आणि गावात अंमलदार आला तर घरातील ओल्या बाळंतीणीला कामाला नेलं जात, गावच्या पाटलाची इज्जत अंमलदारापाशी वाढविण्यासाठी पाटील त्या महाराची तहान-भूक न पाहता राबवून घेतो. गावात चोरी झाली तर त्या चोराचा माग काढायचा .त्याच्या पावलाचे ठसे शोधायचे आणि बाहेर गावाहून पोलीस येईपर्यन्त सापडलेल्या ठशांची राखण करायची. गावात देवी डॉक्टर आला तर घरोघरी फिरुन मुलं टोचण्यास आणण्यासाठी सांगायच. त्यात एखादी नाखुश असणारी स्त्री शिव्या देते . असे उन्हातान्हात फिरत असताना महारास चावडीकडे येण्यासाठी थोडा उशिर झाला की,डॉक्टर म्हणतो बसला जाऊन घरी, पाटील म्हणतो, "माजला म्हार ! कामाची याला जरुरी नाय, जा महट्या चक्कर टाक अजून !" [२] अशी महाराची परवड होते. सणावारास गावच्या लेकी-बाळीना बोलावून आणा, कुणी मेलं दे सांगावा, जळण पोहचव व ही कामे करुन पदरात काय तर शिव्यांचा लाभ नाहीतर उष्ट खरकट. महाराकडे तराळकी,आली की त्यांच्या कामाला अंत नसतो, शांताबाई सांगतात, एकदा घुळा केसरकर आला आणि आप्पाला म्हणाला, "सकाराम, आज तीन दिस झालं, घरच्या माग कुत्र मरुन पडलंया. आमाला ल्य वास येतूया,तेवढ उडवून लांब महीम फाटलां पांदीला नेऊन टाक." [३] अशी ही गावकीची काम.

एवढी काम करुन घेऊन अस्पृश्यांना दिली जाणारी वागणूक मात्र दु:खदायक असे. सवर्णांनी हरिजनांना गावकुसाच्याच नव्हे तर त्यांच्या सर्व न्याय हक्कापासून दूर ठेवले. त्यांचा स्पर्श अमंगळ ठरविला गेला. खेडयात तर ही जातीपातीची व विटाळ चांडाळाची बंधने फारच कडक दिसतात. हरिजनांचा

स्पर्श झाल्याने आपला धर्म बाटतो अशी सवर्णांची भावना बनली होती. शांताबाई म्हणतात " तिसरीच्या वर्गाला आमाला पाटील मास्तर शिकवायला हुतं, त्यांनी आमाला बाहीर बसवलं. ते आमाला शिकू घेत नव्हतं. पोराना पण शिवू देत नव्हतं. आमचं काय चुकलं तर ते लांबूनच छडी मारायचं. पाट्या तपासताना आमाला पाट्या खाली ठिवायला सांगायच. त्यानी पाटी तपासल्यावर खाली ठिवायचं. मग आमी पाटी घेत हुतं, मास्तराला शिवलेलं चालत नव्हतं." [4] तर मुक्ताबाई सांगतात, माझ्या लहानपणी इतर हरिजन चर्चा करीत की, " आमच्या लहानपणी मास्तर म्हारा-पोरांना आम्हाला वर्गाबाहेर बसवत. मास्तर हातातील छडी लांबूनच फेकून मारत. कारण जवळून मारल किंवा जवळून शिकवलं तर विटाळ होईल. कांही फेकून मारलं तर बिघडल कुठ ? रहातील घरी ! राहीनात ! ब्याद ही. नाही आलं तर बरच. म्हणूनच असं कांहीतरी फेकून मारत, नेहमीच." [5] अशी ही हरिजन मुलांच्याकडे पाहण्याची वृत्ती होती.

सवर्णांनी ठरवून दिलेल्या नियमाप्रमाणेच अस्पृश्यांनी वागले पाहिजे, त्याचे उल्लंघन करु नये असा सवर्णांचा दंडक होता. मुक्ताबाईचे वडील सांगतात, महार लोकांनी आषाढात लग्ने करण्याचा दंडक सवर्णांनी करुन ठेवला होता. कारण आषाढात गावातले लग्न करत नसत. जर का गाववाल्यांच्या लग्नाच्यावेळी महारांनी लग्न केले तर त्यांच्या अन्नावरच्या माशा गाववाल्यांच्या अन्नावर जाऊन बसतील व त्यांचे अन्न बाटेल. महार नवरदेवाची वरात सुध्दा कोणतेही वाजप न वाजवता व नवरदेवास घोड्यावर न बसवता ती वरात गावाबाहेरुन नेली जात असत. अशी हरिजनांची सर्व बाजूनी कोंडी निर्माण केली होती. हरिजन सप्ताहाच्यावेळी मुक्ताबाईनी हरिजनांच्याकडून करवून घेतली जाणारी कामे व त्यांना त्याचा मिळणारा मोबदला यावर प्रकाश टाकला आहे. त्या एका खेड्याचे उदाहरण देऊन सांगतात, एका गावातील पाटलाच्या मुलीचं लग्न निघाल्यावर लग्ना आधी तिन-चार महिने महार-मांग बायका-मुलांसह त्या लग्नाच्या कामावर तहानभूक हरवून तुटून पडले. " म्हारा पोरांनी दारातले उकिरडे हलवले. दगडधोंडे,राखमाती,हागलंमुतलं,शेणशेणकुड सार दोन्ही दोन्ही

हातांनी डरीपोटी भरलं, जिवाच्या रेट्यान पुन्हा भरतच होते. झाडझुड करतच होते. त्यांच्या कामाला सीमा नव्हती. त्यातच कुणाचा तसे सांगावा घेऊन जा, बैलगाडी जुपून घेऊन ये कुणाला तरी, अशा कामाना अंत नव्हता" [6] व-हाडच्या गाड्यांच्या बैलांना व पाटलांच्या घरच्या जनावाराना वैरण घाल, उष्ट्या-पाष्ट्याची झाड लोट, लाकडे फोडणे ही सर्व कामे करतो. सर्वांचे जेवण झाल्यावर कामाच्या त्रासाने डोळ्यात झोप असणा-या महारास वाढल जात त्याने परात झोपेच्या नादात हगलेल्या घाणीवर ठेवली. हे अन्न घरी घेऊन जाईपर्यन्त नरक त्या अन्नात मिसळला. हाच तो तीन चार महिने कष्ट केल्याचा मोबदला होता. म्हणून मुक्ताबाई म्हणतात, " मंडळी, जेजूरीच्या खंडोबाच्या नवलाख पाय-या चढण्यापेक्षा माणुसकीची क्वाडं उघडा ! देव तुम्हाला तिथे दिसेल संतांनी हेच सांगीतलय !" [7]

अशा या अस्पृश्यांच्या तहान-भूकेचा विचार न करता किंवा त्यांच्याकडे सहानुभूतीने न पाहता यांच्याकडून फक्त काम करून घेतले जाई. मात्र त्यांच्या जीवाभावाचा सवर्णांनी कधीच विचार केला नाही. मुक्ताबाई हेळवाकच्या ट्रिपला जात असताना सोबतीला असणारे रेस्ट हौस मधील ओव्हरसीअरचे कुंमार व वजीर यांनी महाराना हाक मारताच त्यानी कोठे व काय याची चौकशी न करता ट्रकमध्ये बसले व बरोबर आले. जेवण करतांना मात्र या तराळांना आपल्या पंगतीस बसण्यासाठी या कुंभाराने त्यांना विरोध केला. डाक बंगल्यात झोपण्याच्या वेळी या तराळाना बाहेर व्हरांड्यात झोपण्यास सांगितले. एखादा वाघ कधी येईल व आपल्या पंजाने माणसांना जखमी करील अशी परिस्थिती असतानासुध्दा या तराळांना मात्र बाहेरच झोपवल. ही दिली जाणारी वागणूक पाहून मुक्ताबाई म्हणतात " तराळानी कामं करायची मरणाची. मग त्यातच ते मेले काय अन् जगले काय ? कुणाला पर्वा ? कारण ते तराळच !" [8]

सवर्णांनी अस्पृश्यांची सार्वजनिक ठिकाणी सुध्दा कोंडी करून ठेवली होती. त्यांना देवाळ्यासारख्या ठिकाणी येण्यास मज्जाव होता. शांताबाई लहान- -पणी आपल्या आईबरोबर पंढरपूरच्या यात्रेला गेल्यावर त्यांना जातीने महार

असणाऱ्या चोखोबाचे दर्शन जवळून घेता आले पण विठ्ठलाच्या मंदिरात जाता आले नाही. शांताबाई म्हणतात, "मी आयला म्हणाली, 'आये, चल, आपून इठुबाला भेटायला जाऊ. ती मला म्हणाली, "म्हारा-मांगाला देवळात जाऊ देतं नाहित"'[9] या जातीपातीचे चटके पुढे शिक्षिका म्हणून काम करत असतांना-सुध्दा शांताबाईंना सतत बसले आहेत. त्याचप्रमाणे मुक्ताबाईंचेही अनुभव असेच आहेत. पतीच्या बदलीमुळे मुक्ताबाई इस्लामपूरला आल्या तेव्हा त्यांच्या मुलांना शाळेतील मुले व दुकानदार 'तुझी जात काय ?' म्हणून विचारत. आणि महार म्हणून चिडवत. यामुळे त्यांच्या मनास चटके बसत. या मुलांचा विचार करून मुक्ताबाई म्हणतात, "कोणत्याही अजाणत्या माणसानं दूर हो, शिवू नको' म्हणायचं म्हणजे कोवळेपणी काळजाला खरोखर घर पडत ! पण यांना कळणार कस ?"[10]

महार समाजाचा भूक हा जसा एक मोठा प्रश्न त्याचप्रमाणे पाण्याचाही प्रश्न असे. स्वर्णांच्या विहिरीवर पाणी भरण्यासाठी गेल्यावर ते अनेक मार्गाने त्रास देत. शांताबाई १९६८ सालची घटना सांगतात. करगणी मध्ये गोसाव्याच्या विहिरीवर पाणी भरण्यासाठी गेल्यावर गोसाव्याची पत्नी व त्याच्या आईने विहिरीतील पाण्यात शेण, माती टाकली व त्या म्हणाल्या "काय महारांनी आम्हाला वैताग दिलाया"[11] तेव्हा ही तक्रार हवालदाराकडे केली. हवालदाराने गोसाव्याच्या आईस समजावून सांगत असताना ती म्हणाली "हवालदारसाहेब, हीर माजी हाय. तवा ही महारं विहिरीला शिवत्यात म्हणून मी पानी भरु देत नाय"[12]. तर या पेक्षा एक भलताच अनुभव शांताबाई सांगतात , करगणीत उत्तम कासाराची आई हरिजन स्त्रियांना बांगडया भरत असतांना साडी ऐवजी घोंगडे नेसत. तेव्हा शांताबाईंनी तिला असे का ? म्हणून विचारताच ती कासारीन म्हणाली "तुमचा मला विटाळ होईल म्हणून मी घोंगडी नेसते. घोंगडयाने विटाळ होत नाही"[13] अशी पशुतुल्य वागणूक हरिजनांना दिली जात होती.

प्रत्येक खेडयात स्वर्णांचे त्या त्या गावातील हरिजनांच्यावर वर्चस्व असतेच. महार म्हटला की, तुच्छ स्वरुपाचा, टाकाऊ, दरिद्री अशी त्यांची भावना बनलेली

असते. त्यामुळे हरिजन नमते घेऊनच वागतात. शांताबाईनी सवर्णांच्या वर्चस्वाचा एक वेगळाच अनुभव कथन केला आहे. महुद गावचे लग्नाचे वऱ्हाड बैलगाडीने चोपडीला जात होते. वाटेत बळवडी हे खेडेगांव लागते. चावडीच्या कट्टयावर पाटलांच्या बरोबर इतर कांही लोक बसले होते. त्यांनी जाणारे वऱ्हाड कोणाचे ही प्रथम चौकशी केली. ते महाराचे आहे असे समजताच त्यांनी वऱ्हाडाची गाडी थांबवली व म्हणाले, तुमच्या ओळखीचा बळवडीतील एखादा महार घेऊन या मगच तुमची गाडी सोडतो. तेथील बळवडीतील आनंदा महारास त्यांनी बोलाऊन आणले. आनंदाने पाटलाला लवून जोहार केला आणि म्हणाला "काय पाटील, गाडी का थांबवलीया ?" तो म्हणाला, का ? म्हार रगील हायीत. जोहार आमाला घातला नाय, म्हणून आमी थांबवली"[14] शेवटी गाडीतील पुरुषांनी जोहार घातल्यावरच त्यांची गाडी सोडली. अशी महारांची परवड प्रत्येक ठिकाणी होत होती. यातनामय जीवन त्यांना जगावे लागत होते. जातीपातीच्या बंधनाने त्यांना हैराण करुन सोडले होते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या रुपाने या वर्गास नेता मिळाला. ब्रिटिशांच्या सहवासामुळे व आंबेडकरांच्या झंझावाती जनजागरणामुळे या वर्गाची शिक्षणाची कवाडे उघडली गेली. बाबासाहेबांनी आपल्या सभा संमेलनातून या वर्गात जागृति घडविली. गावकीच्या कामातून व जाती पातीच्या बंधनातून हरिजनांना मुक्त करणे हेच त्यानी आपले परमकर्तव्य मानले. त्यामुळे अस्पृश्य जागा झाला. त्याला त्याच्या पशुतुल्य जीवनाची जाणीव झाली. त्यांनी या सवर्णांच्या कडून होणाऱ्या अत्याचारास व सामाजिक कोंडीस विरोध करण्यास सुरुवात केली. तरीसुध्दा अनेक मार्गानी या सवर्णांनी हरिजनांना छळण्याचा प्रयत्न केला.

मुक्ताबाई सांगतात, कळेलोणच्या हरिजनांच्यावर बहिष्कार टाकून त्यांना गावात व शेतात फिरणे बंद केले. कारण काय तर हरिजनांनी जातीपातीच्या बंधनास व सवर्णांच्या छळास कंटाळून गावकीच्या कामास विरोध केला होता. सवर्णांचे मत होते की, आम्ही सांगू ती कामे हरिजनांनी करावीत व देऊ ती रोजी पत्करावी. उलटा जबाब देऊ नये व कोणाकडे दाद मागू नये. एकप्रकारे

आपल्या कबंस्वाखाली ठेवण्याचा हा त्यांचा प्रयत्न होता. बरं या जाचातून सुटण्यासाठी गाव सोडण्याचीही धमक हरिजनांच्या ठिकाणी नसे कारण दुसऱ्या गावी सुध्दा अशीच अवस्था होईल याची भीती असे. याच गावाच्या तुकडयावर व जीवावर आपण जगतो आहोत ही निराधाराची भावना त्याची बनलेली होती. पाटण मुक्कामी मुक्ताबाईंना एक भाऊ मांग भेटला. त्याच्या मनावर असणारा सवर्णांचा वचक व त्यात स्त्रियांची भूमिका कशी घेतो ते मुक्ताबाई सांगतात या भाऊ मांगाचा धक्का एका हॉटेलवाल्यास लागताच त्याने भाऊ मांगास बेदम मारले. भाऊ मांगाने 'अस्पृश्यता निवारण' या कायद्याखाली त्या हॉटेलवाल्याविरुध्द केस घातली. पण पैशाच्या बळावर हॉटेलवाल्याने साक्षीदार फोडले आणि केसचा निकाल त्याच्या बाजूने लागला. तेव्हा भाऊ मांग पुढील आयुष्याचा विचार करुन म्हणतो, "कुटलातरी येळफरसाहेब आला होता. त्याच्या हाती काय हाय ? कोण मानतय असल्याला ? तो जायाचा एक दिस इथं येऊन, आमची बाजू घेऊन. पन मागनं जलम काढायचाय आमाला गावात. पान्यात ऱ्हाऊन माशासंग वैर करता येईल का ? न्हवं, तुमीच सांगा, असं करुन आमचं गरीबाचं दिवस जात्याल का ?"[१५]

अशीच १९६२ सालची घटना शांताबाई सांगतात, करगणीच्या गावच्या लोकांनी रानात जाऊन तरस मारला व त्यास बैलगाडीत घालून गावातून मिरवणूक काढायची असे ठरविले. गावातील लोकांनी बौध्द लोकांना बोलावून घेतले. त्यांनी सांगितले की, "मेघा, कोंडीबा, रंगा अशी तुमची सगळी माणसे ही गाडी आदलून बदलून [illegible] ओढा" बौध्द लोकांनी त्याना सांगितले, "आम्ही काय ही गाडी ओढणार नाही"[१६] लगेच गाववाले सवळे बौध्द लोकांवर त्यानी बहिष्कार टाकला. त्यांना मळ्यात फिरणे, दुकानातील सामान देणे, गावात हिंडणे-बंद केले. अशी त्यांची कोंडी केली. म्हणूनच बाबूराव बागूल म्हणतात, "या देशात माणसाचा भयंकर अवमान झाला आहे. माणसाचा एका व्यवस्थेने कोंडी करुन मुडदा पाडलेला आहे. आणि म्हणूनच दलित साहित्य माणसास केन्द्र मानते. माणसाच्या स्वातंत्र्याचा उच्चार करते. माणसाला महान मानते आणि देवा - धर्माला माणसापेक्षा लहान मानते."[१७]

खेडयात हरिजनाना असे विटाळ चांडाळात गुरफटून त्यांना अनेक घाण कामे सांगून त्यांचा छळ केला जात होता. शहरात विटाळ-चांडाळ नसला तरी दुसऱ्या अनेक मार्गांनी अस्पृश्यांचा छळ होत होता याचे दर्शन मुक्ताबाईंनी घडविले आहे.

मुंबई मध्ये डॉ. बाबासाहेबांच्या चळवळीमध्ये भाग घेऊन अनेक अस्पृश्य लोकांचे संरक्षण करणारे व अनेक संकटाच्यावेळी धावून जाणारे देवरुखकर यांचा सवर्ण गुंडाकडून खून झाला. कारण काय तर त्याने बाबासाहेबांच्या चळवळीत भाग घेऊन तो त्यांच्या गळ्यातील ताईत झाला होता. यावेळी सवर्ण-अस्पृश्य यांच्यात संघर्ष निर्माण झाला होता. अनेक ठिकाणी दंगे पेटत होते. अनेक ठिकाणी भांडण-मारामारी व अस्पृश्यांना कामावरुन काढून टाकणे असले प्रकार माजले होते. त्यावेळी सवर्ण - अस्पृश्य असे दोन तट निर्माण झाले होते. अगोदरच महारांचे पुढारी म्हणून आंबेडकरांच्यावर शिक्का पडला होता. महार जाती बरोबर इतर जातीतील लोक की ज्यांच्यासाठी बाबासाहेब झटत होते त्या मांग, चांभार इ. जमातीतील लोक बाबाच्या पाठीशी नव्हते. तेव्हा याच चांभार, मांग समाजातील लोक केवळ खुर्चीच्या स्वार्थासाठी कॉंग्रेस पक्षाच्या बाजूने बाबाच्या विरुध्द निवडणुकीत उभे राहात. निवडणुकीत आंबेडकर अनुयायी आपली सर्व मते राखीव उमेदवाराला देत. स्पृश्य हिंदू संख्येने मोठे ते कॉंग्रेसच्या आदेशाप्रमाणे आपली सारी मते कॉंग्रेसने उभ्या केलेल्या हरिजन उमेदवाराला देत .हेतू हा की, आंबेडकरवादी राखीव उमेदवार पडावा. मुंबईत मतदानाच्या दिवशी आंबेडकरांना सॉलीड मते पडताना पाहून वल्लभभाई पटेल यांनी आदेश दिला आणि शेवटपर्यन्त स्पृश्य मतदारांनी हरिजनालाच सगळी मतं दिली आणि बाबासाहेबांना नामोहरण केले. त्यामुळे हिंदू-महार-दंगा झाला. मुक्ताबाई म्हणतात, " आंबेडकरांना वाटे की, राखीव म्हणून निवडून येणारा उमेदवार फक्त अस्पृश्यांच्या मतावरच निवडून यावा. पण कॉंग्रेस पक्ष एखादा चांभार उमेदवाराला उभा करी. मग तो निव्वळ अक्षरशत्रू आणि कधी कुणाला माहीत नसलेला असला तरी त्याना-चालें. कॉंग्रेसवाले संख्येने केव्हाही अफाट. त्यांच्या प्रत्येकी एकेक मतानेही कॉंग्रेसवाल्या हरिजनास खूपच मतं पडतं. शेवटी मतांच्या बाबतीत पाण्याला खांव असेल तेव्हा

सारी मतं त्या राखीव उमेदवाराला द्या, म्हणून आदेश मिळे, हे आताच सांगितले. केवळ आंबेडकराना नामोहरण करण्यासाठी हे कौटिल्य ."[१८]

मुंबईत सदोबा पाटील कॉंग्रेस चा हा माणूस अस्पृश्यांना क्रूरपणे दडपू पाहात. आणि अस्पृश्यांच्यावर हल्ले करीत. भोईवाडा येथे सिमेन्ट चाळीत अस्पृश्य लोक बरेच राहात. जवळच पोलीस स्टेशन इथून सुध्दा या चाळीवर स्वर्ण सोडावॉटरच्या बाटल्या व विटांचा मारा करत. आणि कुठल्या तरी घराचे दार उघडून माणसांना जबर दस्तीने ओढून व्हॅनमध्ये टाकून नेत. गुंडांचा पहारा कायम या चाळी भोवती असत. नायगांव मधील कामगार कल्याण केन्द्रात करमणुकीचा कार्यक्रम पाहण्यासाठी सिमेन्ट चाळीतील माणसे गेली असता स्वर्णांच्याकडून सोडावॉटरच्या बाटल्यांचा वर्षाव झाला. मुलबाळ व बायकांही त्यातून सुटल्या नाहीत.

याचवेळी हरिजनांना मंदिर प्रवेश मिळावा म्हणून सानेगुरुजींनी पंढरपुरात आमरण उपोषण केल.होत. तेव्हा मुक्ताबाई म्हणतात, सटकन माझ्या तोंडात आलं, `सानेगुरुजी पंढरपूरला उपोषण करताहेत` कांही अडणार आहे का त्या मंदिर प्रवेशा वाचून ? इथं बायाबापडयांचे रोज घडाघड मुडदे पडायची वेळ आलीय. इथं करा म्हणाव उपोषण` पण लगेच दुसरं मन म्हणाल, `बिचारे सानेगुरुजी ! कुणी इथ मान द्यायला सांगितली तर इथंही देतील पण त्यामुळे हे सैतान सैतानकी सोडतील काय ? असे कितीतरी सानेगुरुजी खातील हे लोक"[१९]

शांती दलाचे लोक दिवसा ढवळ्या ट्रकमधून येऊन येथे सोडावॉटरच्या बाटल्यांचा मारा करत असा मुंबईत स्वर्ण-अस्पृश्य दंगा पेटल्याने अस्पृश्यांचा स्वर्णाकडून छळ होत होता.

मुक्ताबाई या आधी सहा महिन्यापूर्वी झालेला प्रकार सांगतात. निवडणुकीच्या रणधुमाळीत चोखाजी गांगुर्डे या महार तरुणाचा सुरा भोसकून गुंडांनी खून केला. त्याची प्रेत यात्रा चालली असता स्वर्णांनी या प्रेत यात्रेवर दगड - फेक केली. गोंधळ माजला. पोलीस लोकही या प्रेत यात्रेतील लोकानाच मारु लागले. हुतात्मा गांगुर्डे चे शव मध्येच टाकून लोक पळू लागले, यावेळी कम्युनिस्ट

कार्यकर्त्यांनी मदत करून लोकांना धीर दिला. पळालेल्या लोकांना त्यांनी एकत्र करून शवयात्रा पुढे चालू लागली. इतक्यात एका तरुणाचा आवाज आला तो बेफाम होऊन छातीवर बुक्या मारून घेऊन ओरडत होता, "का हे ? आम्ही कुणाच्या वाटे होतो ? आम्हाला कुणीच वाली नाही ? आम्ही,कांही लांडग्यासारखे कुणाचे लचके नाहीत तोडलेले. लोकशाहीची मिटलेली कवाडं आम्ही मतपत्रिकेच्या हत्यारानं उघडायला निघालो आहोत, तोडायला नाही ! मग का हे ? एक दिवस असा येईल की, त्या दिवसी या पापांचा घडा तुमच्याच डोक्यावर फुटेल ! लोकशाही आहे लोकांची, नही किसीके बापकी !"[20] अशी शहरात अस्पृश्यांना वागणूक देऊन त्यांचे जिणं हराम केलं होतं. अनेक मार्गांनी धाकधपटशा दाखवून अस्पृश्यांच्यावर वचक ठेवण्याचा प्रयत्न केला जात होता व मुख्य म्हणजे बाबासाहेबांना नामोहरण करून त्यांना बदनाम करण्याचा मार्ग सवर्णांनी अवलंबलेला होता. मुक्ताबाई यांनी अस्पृश्य समाजाचे दुःख, दारिद्र्य, दैन्य, लाचारी, भित्रेपणा हे जसे प्रकट केले आहे तसेच सामाजिक छळाला अन्य जातीया बरोबरच स्वजातीयही कसे सहभागी होतात हे देखील दाखविले आहे.

या हिंदू धर्मातील जटील बंधनांना व त्यांच्या अमानुषकीला कंटाळून, बाबासाहेबांनी हिंदू धर्म सोडण्याचे ठरविले. त्यानी शेवटी १९५६ ला येवले या ठिकाणी बौध्द धर्माची दीक्षा घेतली. या बाबांच्या कार्याचे अनुकरण करून शांताबाई व करगणीच्या लोकांनी १९५७ ला बौध्द धर्म स्वीकारण्याचे ठरविले तेव्हा सवर्णानी यांना विरोध केला. ते म्हणाले, "आम्ही महारांना बौध्द धर्माची दीक्षा घेऊ देणार नाही, आम्ही दीक्षा भूमीचे स्टेज जाळून टाकू."[21] पण या धमकीस न जुमानता सर्व हरिजनांनी बौध्द धर्माची दीक्षा घेतली व सर्वांनी ठरविले की, आजपासून कुळवाडयाचे मेलेले जनावर ओढायचे नाही.गावकीची कामे करायची नाहीत. माणूस मेल्याची खबर परगांवी कळवायची नाही.अशी महारानी कामे टाकताच करगणीचा जोगू पाटील म्हणाला, " आम्ही मेलेले जनावर फाडण्याकरिता सुऱ्या पाळू. माणूस मेलेल्याची खबर आम्ही कळवू पण महारानाही आम्ही बघूनच घेतो."[22] आणि शेवटी हे त्यांनी कृतीत आणून

दाखविले. महारांना गाव शिवार यानी बंद केले. त्यांच्यावर बहिष्कार टाकला. शेवटी महारांनी फौजदारी केल्यावर हे प्रकरण मिटले. तेव्हा शांताबाई म्हणतात, "आम्ही महार म्हणून अशीच घाण कामे करावीत. स्पृश्य लोकांनी महार म्हणून आम्हाला तव्यात जेवायला वाढावे. गावातील स्पृश्य लोकांनी आम्हाला महार म्हणून शिवून घेऊ नये. असे आम्ही किती दिवस खितपत पडणार म्हणून आम्ही बौध्द धर्माची दीक्षा घेतली. डॉ.आंबेडकरांनी आम्हाला नवा धर्म दाखवून दिला. यात कसला अन्याय झाला? "[२३] असे ताणतणावाचे संबंध सवर्ण व अस्पृश्य यांच्यामध्ये निर्माण झालेले पाहावयास मिळतात. दलितास आता स्वत्वाची जाणीव झालेली पाहून प्रा.केशव मेश्राम म्हणतात "दलित जाणीव ही मुख्यत: माणूसपणाची जाणीव आहे, आणि ती नव्या शिक्षणामुळे प्राप्त झाली आहे. मी हिंदू धर्माचा असूनही हिंदू धर्माचा कोणी नाही. इतरांना माणूस म्हणून जे अधिकार आहेत ते मला नाहीत, ते मला मिळाले पाहिजेत हे जे पूर्वास्पृश्यांना भान आलं ते इंग्रजी-विद्येचं - वाघिणीचं दूध प्राशन केल्या मुळे. जर पेशवाई बुडून इंग्रजशाही इथं आली नसती तर अस्पृश्याचं हे नष्टचर्य संपलं नसतं."[२४]

या सवर्णांच्याकडून होणाऱ्या अन्यायाची कोंडी फोडण्यासाठी व स्वत:-वर होणारा अन्याय निवारण करण्यासाठी हरिजनांना कचेरीत जाणेही परवडणारे नव्हते. मुक्ताबाई म्हणतात अस्पृश्यांच्यावर होणाऱ्या अन्यायापायी त्यानी कचेरीत जायचं म्हटलं तर दोन-तीन दिवसाच्या भाकरी बांधून जावं लागे. आणि तेवढया दिवसाची रोजी बुडाली तर पोटाला काय खाणार ? असा हा खेडयातील हरिजनांच्या समोर निर्माण झालेला गुंता कधी न सुटणारा; जणू ही मिटलेली कवाडंच होती. म्हणूनच पोट तिडकीने मुक्ताबाई मनातल्या मनात म्हणतात, "ही सामाजिक कोंडी फोडायची असेल तर शहरात जा. आहे काय खेडयात उपासातापासाशिवाय ? इथंही खोपाटच आहे, मग शहरातली झोपडपट्टी काय वाईट ? अपमान तर कुणी करणार नाही ? रोजगार मिळेल, तुमचे धनी तुम्ही रहाल. आणखी काय पाहिजे ? जा शहरात. तुम्ही लेका हो सकाळी उठून चावडीवर जाता तर तिथे गेल्या बरोबर दिसेल त्याला आधी जोहार मायबाप जोहार !` असं म्हणून जमिनीला हात लावून, अगदी वाकून नमस्कार !

पाटील विचारणार, "काय रं कोण हाय ?" "मी, चोखामेळा हाय जी" हे उत्तर द्यायचं. स्वत:च नांव सांगायची हिंमत नाही आणि जातीचा उच्चार जणू अशुभ म्हणून करायचा नाही. म्हणून त्या संत चोखामेळ्याचा उध्दार. महार होता ना तो ? हे असलं जिणं सोडा तरचं मुक्ती मिळेल या नरकातून ! " २५

या जातीपातीच्या बंधनातून अस्पृश्यांना मुक्त करण्यासाठी शाहू महाराजांनी कमी शिकलेल्याना सनदी वकील म्हणून नेमलं व जातीयता कमी व्हावी म्हणून कांही गावातून हरिजन पाटील नेमण्याची योजना राबविली. पण व्यवहारी सवर्णांनी या योजनेची वाट लावली. त्यांना हे सहन होणारे नव्हते. कारण त्यांचा स्वाभिमान आडवा येत होता.

इतका अन्याय, छळ सहन करुन हजारो वर्षे हे अस्पृश्य लोक हिंदू धर्मात राहिले. त्यांना हिंदूत्वाचा अभिमान होता. पण सवर्णांना मात्र यांच्या अभिमानाचे प्रामाणिकपणाचे काहीच वाटले नाही. शेवटी यांनी अस्पृश्यांना पायदळीच तुडविले. यावरुन मुक्ताबाई आपल्या लहानपणाची एक आठवण सांगून या हिंदू धर्मावर ताशेरे ओढतात. कांही महारा-मांगानी ख्रिश्चन धर्म स्वीकारला होता. त्यांच्या स्त्रिया चर्चमध्ये जातानाच कुंकू पुसत व बिगर कासोट्याच लुगडं नेसत. एरवी मात्र हिंदूधर्माप्रमाणे त्या वागत. डॉ.आंबेडकरांच्या जनजागृतीमुळे महार लोकांनी मेलेली जनावरे ओढणे बंद केले होते पण हे काम ख्रिश्चन धर्म स्वीकारलेले लोक मात्र करत होते. केवळ दुष्काळात पोटासाठी किंवा स्वत:च्या मजबुरीमुळे ख्रिश्चन धर्म स्वीकारलेल्या या लोकांच्या अंगी ख्रिश्चन रीतिरिवाज भिनलेले नव्हते. म्हणून मुक्ताबाई म्हणतात, "अशा लोकांना शुध्दीकरण करुन हिंदूधर्मात घ्यायला हवं पण जे हिंदूधर्मात आहेत त्यांच्याबद्दलच नाही कुणाला सहानुभूती मग हे तर दूरच. फारच गलथान आहे हा हिंदूधर्म " २६ मुक्ताबाई पुढे सांगतात, या बाटलेल्या मुसलमान किंवा ख्रिश्चन लोकांना गावात राजरोस फिरता येई. त्याना सिवासिव मुळीच नसे. यांच्या हातचा सरबत सवर्णांना चालत पण ज्यांनी हजारो वर्षापासून हिंदू धर्माबद्दल सहानुभूती दाखवून याच धर्मात राहिले, हिंदूचे सण, उत्सव, रीतिरिवाज पाळले, त्या अस्पृश्यांचा स्पर्श मात्र अमंगळ ठरविला गेला. त्यांना

गावात वावर करण्यास बंदी घातली गेली. म्हणून मुक्ताबाई म्हणतात," पण जे महार-मांग आपल्या धर्मात इमानेइतबारे राहतात, गाव मिरवतं तिथ विठोबाची पताका मिरवतात, इतर हिंदू जे जे उपवास, सणसुद करतात ते करतात तेव्हा याना हिंदू कोणत्या शहाणपणावर दूर ठेवतात[२७]" ? येथे मुक्ताबाईंना हेच सांगावयाचे आहे की, हरिजनांच्या भावभावनांचा त्यांच्या प्रामाणिकपणाचा विचार न करता केवळ जातीच्या शिक्यामुळे त्यांची अवहेलना सवर्णांनी केली. त्यांना स्वतःपासून दूर ठेवले.

आता काळ बदलला आहे. सर्वत्र औद्योगिक क्रांती होऊन परिस्थिती बदलत आहे. कामाच्या गरजेमुळे माणसांचे स्थलांतर होत आहे. जातीपातीस मूठमाती मिळत आहे. श्रमाला प्रतिष्ठा आलेली आहे. तेव्हा मुक्ताबाई म्हणतात पण तो पूर्वीचा काळ ? तराळकी किंवा इनामदार - जमिनदार यांच्या घरची गुलामी हेच होते महाराचं जीवन. या कामाना पर्याय नव्हता, गाव सोडण्यालाही पर्याय नव्हता. दिल उष्ट आणि ते नाकारलं तर खाणार काय ? पुन्हा कोण देणार ? गाव आपल तेलमीठ बंद करील तर ? मग कोण वाली ? त्यांची तटबंदी फोडणार कोण ? कांही पर्यायच नव्हता. ही जणू एक सरंजामशाही होती. आणि तिची मिटलेली कवाड उघडायला ताकद नव्हती. महारामांगात. आधार नव्हता, कुणा नेत्याचा वा कुणा देवाचा ! द्रौपदीच वस्त्रहरण झालं तर श्रीकृष्णाने तिला आभाळाला ढीग टेकेलं इतकी वस्त्र पुरविली. आज गावागावातून अर्धवस्त्र आणि निरन्न बहिणीबापड्या दिसतात, कुठल्या श्रीकृष्ण यादवांना अजून सवड होत नाही काय अवतार घ्यायला ? का आता ताकदच होत नाही ? चोखा मेळ्यानं आपल्या हाताच्या कवेनं जणू सगळ्यांच्या अंतःकरणाला हात घालण्याचा प्रयत्न केला. आर्त स्वरात टाहो फोडला, 'देवा, ऊस डोंगर परि रस नव्हे डोंगा, देवा, तीर डोंगा परि नदी नव्हे डोंगी अन् चोखा डोंगा परि भाव नव्हे डोंगा !' पण देवाच्या सुध्दा अंतःकरणाला तो पाझर फोडू शकला नाही. लोकांनी मात्र त्याची पायरी केली, पायदळी तुडवायला ! रोज शेकडोनी नव्हे हजारोनी ऊडवतात त्याला असेच सवर्णांनी अस्पृश्याना हजारो वर्षे आपल्या

पायदळी तुडविले आहे. त्यांच्या दु:ख, वेदनेचा, इच्छा-आकांक्षांचा कधीच विचार केला नाही. अगदीच पशुतुल्य वागणूक दिली गेली. म्हणूनच डॉ.अनिल अवचट म्हणतात, "दलित जीवनातील करपलेली अंग जगातील शाश्वत दु:खाची आठवण करून देणारी आहेत." [२८]

वरील प्रमाणे शांताबाई कांबळे व मुक्ता सर्वगोड यांनी ग्रामीण व नागर दलित स्त्रियांच्या व्यथा, वेदना मांडत असतांना तत्कालीन सामाजिक परिस्थितीही मांडलेली आहे. यात सामाजिक विषमतेमुळे दलितांच्या नशिबी आलेली दु:खे जशी मांडली आहेत त्याचप्रमाणे स्व-जातीयही यात कसे सहभागी होऊन या दु:खास कारणीभूत होतात हे सर्व प्रांजळपणाने कथन केलेले आहे. अनेक घटना प्रसंगातून वेगवेगळ्या दु:खाची कारणे सांगून हरिजनांची होणारी परवड व त्यास सामाजिक परिस्थिती कशी कारणीभूत ठरत होती याचे स्वच्छ चित्रण कोणताही आडपडदा न ठेवता केलेले आहे. यामुळे तत्कालीन इतिहास व सामाजिक परिस्थितीही वाचकाच्या समोर उभी राहते यामुळेच ही दोन्ही आत्मकथने वाचनीय ठरतात.

## (२) शिक्षणापासून वंचित असलेली स्त्री ---

तत्कालीन स्त्रि जीवनाकडे पाहिले असता खेड्यातील स्त्री ही संपूर्णतया शिक्षणापासून वंचित होती. त्या काळात केवळ दलित स्त्री म्हणून नव्हे तर एकूण स्त्रिया फारशा शिकत नव्हत्या. जणू कांही स्त्रीने शिक्षण घेणे हे गैर समजले जात होते. परंपरेने चालत आलेली गावकीची कामे किंवा मोलमजूरी करून पोटाची भूक भागवणे हेच त्यांनी मान्य केले होते. शांताबाई म्हणतात, " त्या टायमाला पोरीला शाळा शिकवत नव्हती. मुली शाळेत चालल्या तर माणसं नाव ठेवतं हुती" [२९] बाबासाहेब आंबेडकरांच्या जनजागृतीचा हा काळ होता. त्यातून प्रेरणा घेऊन एखादी मुलगी शाळेस जावू लागली तर शिक्षणापासून वंचित असलेल्या इतर स्त्रिया संकुचित वृत्तीने त्या मुलीची उपेक्षा करत. मुक्ताबाई लहान--पणी शाळेत जात असताना कांही स्त्रियांना आश्चर्य वाटायचे, मांगल्या स्त्रिया म्हणत, " बघा मोठ्याच लेकरू, पण हाय का लाड ? आपलाच लाड ! -हा घरीच

मास्तर मारील"[30] ही आठवण १९३१-३२ ची आहे. तर कांही स्त्रिया मुक्ताबाईची उपेक्षा करत. त्या स्त्रिया म्हणत "चालली बघा ! आग ये ss कुठं निघाली ? ल्हान हैस व्हय आता शाळा शिकाया ? लगीन झालं असत तर दोन लेकरं झाली असती. काय लाडाबीज !"[31] शांताबाई सुध्दा असाच अनुभव सांगतात. त्यांच्या ल्हानपणी शाळेस जाताना चिंगळी चौगुलीनीने पाहिले आणि ती शांताबाईच्या आईला म्हणाली, "गवळाबाय, पोरीला शाळंत घातली व्हय ? आय म्हनाली, "होय जी चिंगळाबाय" चिंगळी आयली म्हनाली, "दोडा, पोरीची कसली ग शाळा ?"[32] अशी स्त्री स्त्रीची उपेक्षा करत होती.

या काळात या वर्गाची शिक्षणाकडे दुर्लक्ष होण्याची अनेक कारणे असत. त्यापैकी मुख्य म्हणजे त्यांचे दारिद्र्य, मुलगा किंवा मुलगी थोडी मोठी होताच त्यांचे शिक्षण बंद करून घरच्या कामाला हातभार लावण्यासाठी घरीच ठेवून घेत. शांताबाई म्हणतात "धर्म्याचा बाप म्हणाला, "केरसून्या, कासरा, शिकी आमी वाकाची तयार करतो. त्यासाठी आमाला धर्म्या मदतीला पायजी, इतका फायदा धर्म्या शाळत गेल्यावर मिळणार नाय. आमच्या धंदा पैशाचा हाय"[33] तर रंगी नावाच्या मुलीची आई म्हणते, "नाजे, आमी सगळी रानात शेंगा चाळायला जातुया. घरात कोंबडया पाळल्यात्या. त्याला राकायला कोन नाय. म्हणून आमी रंगीला घरी ठेवतूया. नवा आजपासनं रंगी शाळंत येणार नाय."[34] या कारणामुळे हा समाज मागास राहिला. आणि दारिद्र्याचे जीवन जगू लागला. मुला-मुलींचा भविष्यकाळ उज्ज्वळ करण्यासाठी परिस्थिती त्यांच्या आडवी येत होती. या वर्गास भविष्यापेक्षा वर्तमानच महत्वाचा असल्याचे दिसून येते म्हणूनच अशा परिस्थितीत "केवळ दलित म्हणून नव्हे तर ज्या काळात एकूणच स्त्रिया फारशा शिकत नव्हत्या व त्यातही दलित स्त्रियांना तर शिक्षण मिळणे ही कठिण गोष्ट होती अशा काळात शांताबाईंनी जो शैक्षणिक प्रवास प्रारंभ केला व त्या ज्या इप्सित स्थळी जाऊन पोचल्या त्यांचे कौतुक वाटते"[37(अ)] अशी ही शिक्षणापासून वंचित राहिलेली स्त्री व तिचा शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन या आत्मकथनातून पाहावयास मिळतो व एकंदरीत स्त्री वृत्तीवर प्रकाश पडतो.

(३) दलित स्त्रीचे दारिद्र्य --

खेड्यात राहणाऱ्या एकंदरीत अस्पृश्य वर्गाचे जीवन अत्यंत हलाखीचे असलेले पाहावयास मिळते. हजारो वर्षापासून गावकुसाबाहेर सवर्णानी ठेवलेल्या या अस्पृश्य वर्गाचे जिणं अनेक दु:खानी भरलेले पाहावयास मिळते. यांचे राहणीमान निकृष्ठ दर्जाचेच पाहावयास मिळते. कशातरी झोपडीवजा गवताच्या काड्याने शाकारलेल्या घरात राहात. शांताबाई म्हणतात, "पावसाच्या दिसात आमचं घर गळायचं. आय,आप्पा रातभर जितं गळतं आसलं तितं पितळी, मगुलं,लोकंडाची पाटी लावत पावसाच्या पाण्यानं भांडी भरल्यावर पानी भाईर टाकत.मी,भगवान जितं गळत नसलं तितं झोपत आसू. सगळं घर गळायला लागल्यावर आमी उटून रातभर पेंगत बसत हुतू. वाकळा,पोत्याची पटकारं पार भिजून चिंब होत हुती." [३५] अशा या जीवनाचा स्त्रीसुध्दा एक घटक होती. तिच्या नशिबी एक स्त्री म्हणून दु:ख आहेच, पण दलित स्त्री म्हणून इतर स्त्रियापेक्षा तिच्या वाट्यास जास्तच दु:ख आलेले पाहावयास मिळते. दलितांच्या दु:खापासून ती मुक्त नव्हती. ती सकाळी लवकर उठून कोणातरी तालेवाराच्या किंवा पाटलाच्या घरचे काम शिळ्या अन्नासाठी करत.उपाशीपोटी व अर्धवस्त्राच्या अवस्थेत शेतात कामाला जात. येता येता शेतातून गवतकाडी आणून विकत. गिऱ्हाईकाना गवत घेण्यासाठी मिनतवाऱ्या करत.आपण सकाळपासून उपाशी आहोत, घरी मुलेपण उपाशी आहेत असे अगदी कळकळून सांगून गवत घेण्यासाठी मिनतवाऱ्या करत. तेव्हा मुक्ताबाई म्हणतात " त्यांच्या कळवळण्याचा कोणावरच परिणाम होत नसे. जेव्हा कमी पैसा देऊन गवत पदरात पडेल तेव्हं याना पाहिजे असायचं" [३६] या स्त्रियांच्या अशा दु:खदायक अवस्थेकडे पाहून मुक्ताबाईचे वडील आपल्या लहानपणाचे दु:ख सांगतात. ते म्हणतात, आमचे वडील प्लेगाच्या साथीत मरण पावल्यावर मी व माझी आई पोट भरण्यासाठी भगूरदेवळालीला आलो. आई डोंगराला जाऊन लाकडे आणत आणि ती विकल्यावरच आमच्या पोटाला मिळतं. या दारिद्र्यामुळे आईच्या डोळ्यातून आसवं गळतं.ते पुढे म्हणतात, " दुनियाला लाकडे विकणारी ती तिच्या स्वत:च्या

चुलीला मात्र लाकूड नसाव ? देव आहे का जगात ? "[37] ते पुढे सांगतात, पंचमीच्या वेळी महार समाजाचं पोटाचं फार हाल होत. शेतक-याच्या धान्याच्या पेवात उतरनन धान्य काढणारा थकून जाई, त्याला खंग मरे. यासाठी मजूरी म्हणून किडलेले धान्य त्याच्या पदरी पडायचे. पण मजूरी मिळते यातच महार लोक धन्यता मानत. आषाढाच्या वेळी तर केवळ घुग-या करनन पोट भरण्यासाठीसुध्दा धान्य मिळत नसे. त्यावेळी शेतात मिळेल ती भाजी आणून उखडून त्यात चिमूटभर पीठ घालून भाकरी केल्या जात. त्याही पोटभर नसत.फक्त पाणी पिण्यासाठी आधार होई. या भाजीच्या भाकरीमुळे हगवण लागत.तेव्हा ते म्हणतात, "पोटात भुकचा आगडोंब बघावा का ही हगवण बघावी ? मग ही हगवणाचं बरी नव्हं का पोटातल्या आगीपेक्षा ?"[38] असा वारंवार उपास घडत. मुक्ताबाईच्या वडीलाना जणू कांही हेच सांगावयाचे आहे की,अस्पृश्यांचे दारिद्र्य हे त्यांच्या पाचवीलाच पूजलेले असून युगानुयुगे चालत आलेले आहे. तराळकीची किंवा अन्य कामे केल्यामुळे गावातून भाकरी मागून आणाल्या जात आणि त्यावरच यांचा गुजारा चालत. शांताबाई म्हणतात, "आप्पा बैल संभाळ तुया म्हणून एक वक्ताला गावातल्या भाकरी मागून आणायच्या ठरल्या हुत्या म्हणून आय भाकरी मागत हुती"[39] त्याच बरोबर बलुत्यावर जगणारा हा समाज सुगीत खळ्याच्या मालकाने ज्वारी भरनन नेल्यावर खळ्याच्या समोवती पडलेली ज्वारी मातीसह गोळा करनन पाटील भरीत. या बरोबरच शांताबाई सांगतात, "ज्वारी खाऊन बैलाचं शेन पडल्यालं ती फडक्यात बांदून घरी आनायच्या. वाडयात जाऊन मातरं पाण्यानं टोपल्यात घालून धुयाच्या. ती जवारी पाटील भरत.फडक्यातला श्यान पाटीत,घालून धुवायच्या - ती जवारी फडक्यात बांदून घरी आनायच्या"[40] ही पोटाची आग भागवण्यासाठी अनेकदा मेलेल्या जनावाराचे मटण खाल्ले जात. अशी पोटापाण्याची परवड सतत होत राही. म्हणूनच अस्पृश्यतेच्या जोडीने असलेल्या सर्वव्यापी दारिद्र्य आणि तज्जन्य भूक हे ही या दु:खाचे अनेक वेळा कारण असलेले पाहावयास मिळते.

एकदा तर बारा दिवसाची बाळंतीण असणारी लालू महारीन हिने चौगुल्याच्या मळ्यातील ओली मक्याची कणसं भुकेपोटी खाली.चौगुल्याने तिला

विचारताच ती म्हणाली " मी बारा दिवसाची बाळतीन हाय- पोटात आग पडलीया - काय माती खावं का ? म्हणून,मी मकची कणसं खातीया, काय करायचं ती करा "[४१] अशी ही दारिद्र्यात खितपत पडलेली खेड्यातील अस्पृश्य स्त्री अत्यंत बकाळ स्वरूपाचे जीवन जगत असलेली पाहावयास मिळते. शिक्षणापासून वंचित असल्याने व गावाच्या जीवावरच जीवन अवलंबून असल्याने हिचे जिणं स्वाभिमान शून्य व लाचारीचे बनलेले आहे.

पण शहरातील दलित स्त्रीचे जीवन तरी सुखासमाधानाचे कोठे होते ? तिच्याही भाळी भणंगपणाचेच जीवन आल्याचे दिसते. या शहरात राहणाऱ्या स्त्रीच्या जीवनाचे दर्शन मुक्ताबाईंनी घडविले आहे. सारा गाव झाडून स्वच्छ करणाऱ्या या स्त्रियांच्या घरची अवस्था बकाल स्वरूपाची होती. कोणाला आंघोळ नसे. दारातच सर्व विधि करून या स्त्रियांची मुले तशीच फिरत. म्हणून मुक्ताबाई म्हणतात, " शहरातल्या मोठमोठाल्या गल्ल्या झाडणारी बाई आपल्या दाराला,अंगणाला पारखी दिसायची "[४२] सर्वत्र गुरवाडी असणारी ही वस्ती. मुलांच्या अंगावर काळे ओघळ, त्यात ही नागडी-उघडी,डोक्यावर केसांच टोपलं,अगदी जनावारासारखी. पुरुषा मात्र कांहीही काम न करता बायकांच्या जीवावरच बसून खात. पण घरची व मुलांची स्वच्छतेची कामे त्यांच्या हातून होत नसत. त्यांची काम करण्याची वृत्तीच लोप पावली होती. या सर्व अवस्थेकडे पाहून मुक्ताबाई म्हणतात, " ज्या घडधाकट पुरुषांनी या मुलांच्या बापानी फुकटच्या पाण्यात आपली मुलं स्वच्छ का ठेवू नयेत "[४३] याच मुंबईच्या चाळीत राहणारा व शिक्षणापासून वंचित असलेली अस्पृश्य समाजही बकाळ स्वरूपाचेच जीवन जगत होता. एकाच खोलीत, खुराड्यात राहिल्याप्रमाणे चारऱ्याच कुटुंबे राहात असत. एका कुटुंबाचे जेवण झालं की, ते मुलीबाळीसह बाहेर फुटपाथवर येऊन बसत. कधी कधी ही माणसे दिवसभर रस्त्यावरच असत. याच खुराड्यात क्षय व टी.बी.चे रोगी कोपऱ्यात बसलेले असत. कुणाच्या बरगड्या बाहेर पडलेल्या,अंगात रक्ताचा पत्ता नव्हता अशा कित्येक स्त्रिया येथे होत्या. तर बिडीचे थोडूक पायाच्या बोटात धरून बसलेला,डोक्यावर घुळीने माखलेले केसांच जंगल असलेला, घरातील डेचकी

मारवाडयाच्या दुकानात ठेवून सट्यात पैसे लावून विचार करत बसलेला पुरुषाचा प्राणी दररोज दारु पित. आपले पुरुषाचे वर्चस्व दाखवून बायकोच्या जीवावर बसून खात होता. म्हणून मुक्ताबाई म्हणतात, याना दोन शहाणपणाचे शब्द कोण सांगणार ? राजकारणी लोकानीसुध्दा आपल्या पुढारीपणाला धक्का लागू नये म्हणून या वस्तीला सुधारण्याचा कधीच प्रयत्न केला नाही. पुढे मुक्ताबाई म्हणतात," राजकारणात काय, काढ वर्गणी, दे घोषणा, हो पुढारी, असं चालतं पण प्रत्यक्ष काम कोण करणार ? या बश्या पुरुषांना उद्योग करण्याची प्रेरणा कोण देणार ? "[४४] अशा अवस्थेमुळे हा वर्ग दारिद्र्याच्या चिखलात दिवसे दिवस रुततच चालला होता. स्त्रियांची मात्र पोटासाठी सतत धडपड चाललेली असते.

यातून शिकून शिक्षिका बनलेली व मुंबईत राहणारी मानेबाईसारखी एखादी स्त्री मुक्ताबाईना पाहावयास मिळाली. तिचा संसार नीटनेटका होता पण बरीच अस्पृश्य कुटुंबे दारिद्र्यातच जीवन जगत होती. त्यांच्या विकासाची गरज होती.

शहरातील स्त्री जीवना पेक्षा खेडयातील स्त्री-च्या जीवनाचे वकालपण दाखवून देण्यासाठी मुक्ताबाई दारफळ या खेडेगावातील स्त्रीचे जीवन दाखवून देऊन व्यथित होतात. तिचं कसंतरी झोपडीसारख घर. मातीची भांडी, अंगावर फाटक-तुटक पातळ,डोक्यावर बिनतेलाच केसाचं टोपल, हिरवेगार दात,चूल भरण्याचा पत्ता नाही. दारातच उकीरडा. उठल्या उठल्या मुलास पटकुरावर टाकून कोणातरी तालेवाराच्या घरी जाऊन शेण काढणे, गोठा साफ करणे, कांडून कुटून देणे, इत्यादी कामे करते.कांही शिळेपाके पदरात घेऊन दुपारी घरी येते. असे हे वकाळ जीवन पाहून मुक्ताबाई म्हणतात," मानेबाईचं घर प्रतिनिधिक स्वरुपाचं आहे ते जणू कांही आमचं पुढचं पाऊल दाखवत आहे. आणि त्या तिथलं ? दारफळचं ? माणूसकी मेल्याचं, मन मेल्याचं किंवा आणखी कांही दाखवून मन विषण्ण करणार आहे. मानेबाई सारखी नेटकी बि-हाड मुंबईत शेंकडो नव्हे हजारो निघतील पण बाकीच्यांच काय ? "[४५] अशी शिक्षणापासून वंचित राहिलेली व मागास स्वरुपाचेच जीवन जगणारी स्त्री येथे पाहावयास मिळते.

एकंदरीत काय ग्रामीण किंवा नागर जीवनात जीवन जगणारी अशिक्षित

स्त्री दिवसभर काबाडकष्ट करुन सुध्दा लाचारीचेच जीवन जगत होती.

पण मुक्ताबाईंना सवर्ण व दलित स्त्रीया जीवनात एक फरक जाणवला तो येथे सांगून जातात. मुक्ताबाईंना पाटण मुक्कामी सतत कष्ट करणारी एक सवर्ण स्त्री लिलूची आई पाहावयास मिळाली. रात्र-दिवस कष्ट करुन सुध्दा तिच्या चेह-यावर कायम तेडा असे. मुक्ताबाई म्हणतात, या सवर्ण स्त्रियापेक्षा अतिकष्ट उपसणा-या अस्पृश्य स्त्रिया होत्या. पण या अस्पृश्य स्त्रियांच्या चेह-यावर मात्र कायम लाचारी दिसते. कायम कष्ट उपसूनही दुस-याच्या मर्जीवर मेहरबानीवर, दयेवर यांचे जीवन अवलंबून असते . म्हणून लेखिका अंतर्मुख होऊन म्हणतात, लिलूच्या आईच्या माथी म्हारकी नव्हती. तिला कोणी उष्ट-माष्ट देत नव्हते की ती कोणाच्या दारी मागावयास जात नव्हती.कारण ती कष्ट करुन स्वाभिमानाने जीवन जगत होती. पण ही स्वाभिमानाची वृत्ती हरिजन स्त्रीया ठिकाणी पाहावयास मिळत नाही.ती म्हारकीच्या भावाच्या जाळ्यात व सवर्णांच्या लाचारीत अडकून पडलेली होती. लिलूच्या आईचा स्वत:चा घरचा एक खोंड होता. त्याच्या जीवावर ती बदली दुस-याचा बैल आणून शेतीची कामे करुन घेत होती व स्वत: दुस-याच्या शेतात कामास जाऊन दुस-याच्या मदतीने स्वत:चीही कामे करुन घेत होती.तेव्हा मुक्ताबाई म्हणतात, "हीच माणसं, गावातल्या महारामांगाच्या एक दोन बि-हाडाना असं आपल्या बरोबर ओढून नेतील तर तीही आपलं लंगडपण विसरतील, दुबळ लाचारपण घालवतील" [४६] पण या अस्पृश्यांच्यावर जातीचा शिक्का पडला होता ना केवळ्या जातीत जन्मल्या मुळे या सवर्णांनी हरिजनाना कधीच मदतीचा हात दिला नाही. उलट त्याच्यावर अनेक मार्गांनी त्यांनी अन्यायच केलेला आहे. त्यामुळे यांचे दारिद्र्य दिवसे दिवस वाढतच गेलेले पाहावयास मिळते. अशी सामाजिक विषमता दाखवून देतात.

खेडयात राहणा-या व बलुत्यावर जगणा-या या हरिजनांच्या दु:खा बरोबरच याच खेडयात राहणारे व गावची सेवा करणारे इतर कसबी बलुतेदार यांच्याही दु:खावर मुक्ताबाईंनी प्रकाश टाकला आहे. त्या आपल्या गावात पाहिलेली परिस्थिती येथे सांगतात . कारभर गावची शेतीची अवजारंफुकट करुन

देणारा व सुगीच्या वेळी खळ्यावर बलुत घेणारा, गवंडी काम, सुतारकाम व लोहार काम करणारा गुंड्या लोहार याच मोटचं चाक, दोर चोरीला गेल्यावर याने त्या जमिनीच्या चतु:सीमा व विहीरीचे नक्की ठिकाण आणि बांधावरचे झाड हाताने काढलेल्या नकाशात हुबेहुब काढले होते. तर असाच नाना जिनगर लोहार काम करत. हा गावठी पिस्तुल तयार करत. कुंभार आपले कसब दाखवून लहानमोठ्या रंगीबेरंगी बाहुल्या व गणपती तयार करत. त्यांच्याकडे रंगविण्याचे कसब होते. त्याच गावातील न्हावी कणाच्या ताटासाठी तालेवारांच्या घरी नागपंचमीला नागोबाच्या मूर्त्या पुरवत. तेव्हा मुक्ताबाई म्हणतात इतके सार करून हे बलुतेदारच. हे सर्व कष्ट ते बलुत्यासाठीच वर्षभर करत. त्या न्हाव्याच्या स्त्री कडे पाहून मुक्ताबाई म्हणतात, "हो खरचं! न्हावी पण बलुतेदारच ना? दिल लावून कुणी तरी यांच्यामागं हे लफडं! बिचारे! सण वाढून मिळतो म्हणून खूष![9]47 मुक्ताबाईंना यातून हेच सांगावयाचे आहे की, या सर्व बलुतेदारांच्या कसबाचीकिंवा गुणांची सवर्णांनी दखल घेतली नाही. केवळ स्वत:च्या फुकटच्या कामासाठी मात्र त्यांना बलुत्यासाठी राबवून घेतले. आणि हे बलुतेदार ही कोणतीच तक्रार न करता हे काम करत असत. अशी हरिजनापासून ते इतर सर्व बलुतेदारांच्या दु:खावर मुक्ताबाईंनी प्रकाश टाकला आहे अशा रितीने दलित वर्गाच्या व त्या समाजात राहणाऱ्या दलित स्त्रियांच्या दु:खावर प्रकाश टाकत असतानाच एकंदरीत महारा प्रमाणेच बलुत्यावर जीवन जगणाऱ्या इतर बलुतेदारांच्या परिस्थितीवर प्रकाश टाकून या गावगाड्याचे चित्र वाचकासमोर उभे केले. यात वाचकाच्या मनास चटका लावणारे दलित स्त्रियांचे दु:ख अगदी वस्तुनिष्ठपणे चित्रित केले आहे. सर्वांगाने दरिद्री, कंगाल, दु:खमय व लाचारीचे जीवन जगणाऱ्या दलित स्त्रियांच्या जीवनावर प्रकाश टाकला आहे.

(४) धार्मिक परिस्थिती ---

हिंदू धर्मावर धार्मिकतेचा पगडा जबरदस्त आहे. धर्म ही संकल्पना लोकांचे जीवन व्यापून राहिलेली पाहावयास मिळते. धार्मिकतेच्या भावनेतूनच अनेक

देवदेवतांची पूजा-अर्चा केली जाते, आणि त्यातून अंधश्रध्देला स्वतपणाी मिळते. प्रत्येक जातीप्रमाणेही वेगवेगळी देवस्थाने निर्माण झालेली पाहावयास मिळतात. त्यांची आराधना करुन, एखाद्या बकरे किंवा कोंबडयाचा बळी दिल्याने स्वत:वर आलेल्या अरिष्टामधून सुटका होते अशी भावना मनात दृढमूळ झालेली असते. जीवनातील कोणत्याही कार्याच्या वेळी प्रथम देवाची पूजा करणे हे याचेच प्रतिक आहे. परंपरेने चालत आलेली ही धार्मिकतेची भावना 'माझ्या जन्माची चित्तर कथा' व 'मिटलेली कवाडे' या आत्मकथना मध्येही पाहावयास मिळते. या धार्मिकतेच्या भावनेतून सुशिक्षित व्यक्ती सुध्दा सुटलेली नाही याचा प्रत्ययही येथे येतो.

दररोजच्या जीवनामध्ये कांही वेळा संकटे निर्माण होतात. त्या संकटामध्ये कांही नैसर्गिक असतात तर कांही योगायोगाने निर्माण झालेली पाहावयास मिळतात. पण त्याचे निवारण करण्यासाठी वेगवेगळे मार्ग अवलंबले जातात. शांताबाईची बहिण गंगू हिला सिवण्यात दिली होती. तिला कावळा शिवतो. कावळा शिवणे म्हणजे कांहीतरी वाईट आपती ओढवते हा विचार मनात निर्माण झाला. त्यावर उपाय म्हणजे कोणीतरी तिच्यासाठी रडल्यावर येणारे संकट टळणे अशा समजूतीने गंगूने आपल्या आईस हुसमबापकडून सांगावा धाडला की, "तू आयला सांग, तुमची गंगू आज सकाळी मेली असं सांगितल्यावर ती रडायला लागली का लगीच सांग - तुमची गंगू चांगली हाय. पर आज तिला कावळ्यानं शिवलं म्हणून सांग"[४८] त्याच प्रमाणे घरात कोणी आजारी असणे, औषधोपचाराने त्यास गुण येईनासा झाला की, आपल्या वाईटयावर असणाऱ्याने कांही तरी करणी केली असावी म्हणूनच औषधाचा गुण येत नाही असा समज करुन घेऊन मग एखाद्या देवऋषाकडे धाव घेतली जाते. आईला औषधोपचार करुन देखील तिला गुण येईना तेव्हा शांताबाई म्हणतात, "आय आप्पाला म्हणाली, 'काय वं, मला टोचणी केली! मी गोळ्या खाल्या, तरी बी गुन येत नाय, तवा मला कुणीतरी करणीच केली आसल. गंगूला न्यायला तिचा नवरा आला होता तवा तिला आपून पाठवली नाय. त्यातच मला करनी केली आसलं"[४९] अशा एखाद्या व्यक्तीवर संशय घेतला जातो. शांताबाईच्या आईचा आजार वाढतच गेला ती कांहीच खाईना म्हणून शांताबाईचा भाऊ म्हणाला,

"चांडवल्या देवरुषाचा हाय. त्याच्याकडे तरी बघूया"[50] तेव्हा चांडवल्याने अंगारा एक लिंबू मारुन दिला आणि म्हणाला, "तो तुझ्या आयच्या दंडात बांद आन् अंगारा कपाळाला लाव"[51] शेवटी सोनवडीला जाऊन शांताबाईच्या भावाने देवरुषाला बोलाऊन आणले. त्यान सांगितल, "तुमच्या आयला करणी केलीया. तवा तुम्ही सात पिळ्याच खिळं, सात सूया, सात लिंबं, एक खैरा कोंबडा, सात कोळण्याच तेलरांद करा"[52] एकाने सांगितलेले हे सर्व जिन्नस शांताबाईच्या आईच्या अंगावरुन उतरुन टाकले.

याच दरम्यान लेखिका शांताबाई या पण थंडी तापाने आजारी पडल्या, त्यांच्यावर डॉक्टरी इलाज न करता देवरुषाचीच मदत घेतली. जानकू नावाच्या स्त्रीच्या अंगात आलं. ती घुमू लागली. तिनं सांगितलं, "मी खऱ्या वड्यातली हाय. मला पिवळा भात, अंड दिल्याशिवाय मी जाणार नाय"[53] असे अंधश्रध्देने झपाटलेल्या या माणसांचा मानवी शक्ती पेक्षा भूत पिशाच्यावर मोठा विश्वास होता. असाच एक अनुभव मुक्ताबाई सांगतात. दारफळ या खेडेगांवी एका उकिरडयात दहा-बारा दगडांना शेंदूर लावलेला पाहून त्यांनी एका बाईला विचारले की हे काय ? तेव्हा ती बाई म्हणाली, "आगाय, ती सटवाय हाय की, ती पावतीया नवसाला. पयल्या पोराला काळी पाठ कापावीच लागतीया, या सटवायाला"[54]

आणखीन एक वेगळाच अनुभव शांताबाई सांगतात. शांताबाईची बहिण गंगू हिचा मुलगा कृष्णा एकाएकी आजारी पडला व त्याचे हातपाय उरावर आले. आणि लघवी बंद पडली. लगेच गंगूने देवरुषाकडे धाव घेतली. देवरुषा गंगूला म्हणाला, "बाई तुझ्या मुलाला लागिरीने झपाटले आहे म्हणून तुझ्या मुलावरुन खैरा कोंबडा उतरुन टाक."[55] यापेक्षा एक प्रकार पुढे सांगतात. शांताबाईचा भाऊ दत्तू मातसुळाने आजारी पडला. त्यावर डॉक्टरी इलाज न करता एक चांभार त्यास खुरपे तापवून डागण्या देणार होता.

A
11974

कोणतेही संकट असो त्यातून आपले निवारण होण्यासाठी कांही वेळा नवस केले जाते. या नवसाचे प्रकार व ते फेडण्याचेही मार्ग वेगवेगळ्या स्वरुपाचे

पाहावयास मिळतात. शांताबाईंचा मामा याने असेच एक नवस फेडण्यासाठी एक बकरे मसादेवीस कापले. या नवसाबाबत मामा शांताबाईंच्या आईंना सांगतो, " गौळण, पोरगं लय आजारी पडलं हुतं , तवा देवसाच्या गुनाच्या अंगात आलं. तिनं हारळी दिऊन सांगितल --" लय दिस झालं, माजी जत्रा केली नाय. मी आता लय भुक्याजलीय ," मामा म्हनला " बरं हाय, देवा." माझ्या पोराला बरं वाट् दी. तुजी जत्रा करतु " [५६] व हा नवस फेडल्यावर मामाच्या मुलास बरे वाटले.

या अशा नवस-सायासाच्या प्रभावातून स्वत: लेखिका शांताबाईसुध्दा सुटल्या नाहीत. विमेन कॉलेजमध्ये ट्रेनिंगला गेल्यावर त्यांची सहल शोखशिलीम येथे गेली. स्वत:ची मुले जगत नाहीत म्हणून शांताबाईंनी शोखशिलीम चिस्तीला नवस केले. आणि हे नवस फेडण्यासाठी १९५४ साली खरसुंडीला जाऊन सिध्दनाथच्या यात्रेत नवसाचे सर्व विधि करून पाच फकिरांना बोलावून त्यांना दक्षिणा दिला व मुलास त्यांनी सव्वावरून उधळणे असेही सांगून जातात.तसेच मुलं जगत नाहीत म्हणून ते जन्मल्या-जन्मल्या त्याचे रक्तातच नाक टोचण्याचेही कबूल करतात. त्या म्हणतात, " मुलाचे नाक सोन्याच्या मुद्दीने रक्तात टोचले म्हणजे मुले जगतात असे अनेक बायकांनी मला सांगितले होते." [५७] हा देखिल एक अंधश्रध्देचाच भाग आहे. म्हणजेच शांताबाई स्वत: सुशिक्षित असून देखिल परंपरेने चालत आलेल्या या अंधश्रध्देच्या जोखडातून त्यासुध्दा सुटल्या नसल्याचेच त्या एक प्रकारे कबूल करतात. यातून त्यांच्याही मनावर धार्मिकतेचा पगडा असल्याचे दिसून येते.

या लोकांना भूत-पिशाच्च व नवस-सायासाबरोबरच भविष्यावरही मोठा विश्वास असल्याचे दिसून येते. शांताबाई सांगतात, " महुदच्या बाजारात एक भविष्य सांगणारा पोपटाच्या सापळ्यासह बसला होता. भविष्य पाहण्यास येणाऱ्या व्यक्तीला त्या पोपटाने काढून दिलेली चिठ्ठी तो माणूस वाचून दाखवित. मांगाचा सदाशी असाच आपले भविष्य पाहण्यासाठी गेल्यावर त्या व्यक्तीने त्याचे भविष्य वाचून दाखवले की, " तू आठ दिसात मरचील " [५८] असं समजताच मांगाचा सदा बाजार न करता रडत घरी गेला. त्याची बऱ्याचजणांनी समजूत काढली पण त्याचा लोकांच्या बोलण्यावर विश्वास बसला नाही. आपण

आठ दिवसात मरणार म्हणून तो सर्व नातेवाईकांना भेटून आला. त्याने अन्नपाणी सोडले पण आठवा दिवस संपून गेला तरी तो मरण पावला नाही. मात्र या मरणाच्या भीतीने स्वत: सद्या व त्याच्या घरची माणसे भयभीत झाली होती असे कितीतरी धार्मिकतेचे व अंधश्रध्देचे प्रसंग या आत्मकथनामध्ये पाहावयास मिळतात. लोकांच्या मनावर असा विचार बिंबलेला असतो की, स्वत:वर संकटे येणे म्हणजे दैवी शक्तीचा कोप होणे. देव स्वत:वर रागात असणे असा समज करुन घेऊन या संकटातून मुक्त होण्यासाठी वेगवेगळे उपायही ती माणसे करतात. त्यामुळे धार्मिकता व अंधश्रध्दा हे त्यांच्या जीवनाचा एक भागच बनलेले पाहावयास मिळते. यातूनच रुढी व संकेतांचा उगम झालेला पाहावयास मिळतो.

समारोप --

वरील दोन्ही आत्मकथनातून अस्पृश्य समाजाच्या नशिबी दु:ख आणि दु:खच असलेले पाहावयास मिळते. त्यात स्त्रीचे जीवन तर फार दयनीय स्वरुपाचे दिसते. तत्कालीन सामाजिक परिस्थितीचा आढावा घेता सवर्णांनी या समाजास आपला दास म्हणूनच वागणूक दिलेली दिसते. त्यांच्या मनाचा किंवा हाल - अपेष्टांचा कधीच विचार केलेला नाही. या सवर्णांच्या अत्याचाराच्या वृत्तीमुळे व आंबेडकरांच्या सारखा वाली या समाजाला मिळाल्यामुळे दलितांच्यामध्ये बंड करण्याची वृत्ती निर्माण झाली. या जातीयतेच्या विरुध्द ते उभे राहू शकले. दारिद्र्यामुळे व अज्ञानामुळे यांचे जीवन रसातळाला पोहोचलेले पाहावयास मिळते. एकूण स्त्रियाप्रमाणेच त्यावेळची दलित स्त्री सुध्दा शिक्षणापासून वंचित होती. परंपरेचे जीवन जगत होती. त्यांच्या अज्ञानामुळे व अडाणीपणामुळे यांचे जीवन बकाल स्वरुपाचे बनलेले पाहावयास मिळते. या लेखिकांनी स्वत:च्या मनाचा आत्मशोध घेता घेता तत्कालीन सामाजिक जीवन, अस्पृश्य वर्गातील स्त्री जीवन त्यांच्या अंधश्रध्दा व सवर्ण आणि अस्पृश्य यांचे संबंध यांचाही शोध घेण्याचा

प्रयत्न केला आहे म्हणूनच आरती कुलकर्णी म्हणतात, " एकाचवेळी आत्मदर्शन व समाज दर्शन , एकाच वेळी आत्मबोध व समाजबोध , एकाचवेळी आत्मसंघर्ष व समाज संघर्ष अशा या सृजनशील द्वंद्वातून रुपास येणारी दलित आत्मकथने ही सूक्ष्म व सखोल अभ्यास विषय आहेत. " [५९]

## संदर्भ सूची


१ सौ.शांताबाई कृ.कांबळे - "माज्या जल्माची चितर कथा"
सुगावा प्रकाशन, पुणे, द्वितिय आवृत्ती
६ डिसेंबर १९९०. पृ.१४.

२ मुक्ता सर्वगोड - 'मिटलेली कवाडे', चेतश्री प्रकाशन,
अमलनेर, प्रथमावृत्ती, ५ नोव्हेंबर, १९८३ पृ.३३.

३ सौ.शांताबाई कृ.कांबळे -- उ. नि. पृ.६०.

४ - तत्रैव - पृ.६.

५ मुक्ता सर्वगोड -- उ. नि. पृ.१५.

६ - तत्रैव - पृ.७७.

७ - तत्रैव - पृ.७८.

८ - तत्रैव - पृ.८०.

९ सौ.शांताबाई कांबळे - -- उ. नि. पृ.१४.

१० मुक्ता सर्वगोड -- उ. नि. पृ.५८.

११ सौ.शांताबाई कृ.कांबळे -- उ. नि. पृ.१४१.

१२ - तत्रैव - पृ.१४२.

१३ मुक्ता सर्वगोड -- उ. नि. पृ.१४३.

१४ सौ.शांताबाई कृ.कांबळे -- उ. नि. पृ.३८.

१५ मुक्ता सर्वगोड -- उ. नि. पृ.७३.

१६ सौ.शांताबाई कृ.कांबळे - ` माझ्या जल्माची चित्तरकथा `
सुगावा प्रकाशन,पुणे, द्वितीय आवृती,
६ डिसेंबर,१९९०. पृ.१३८.

१७ प्रल्हाद वडेर - अनुभव आणि आकार, प्रकाशक - मेहता
पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृती,
जुलै १९७९ पृ.४ .

१८ मुक्ता सर्वगोड - ` मिटलेली कवाडे `, चेतश्री प्रकाशन,
अमळनेर,प्रथमावृती ,५ नोव्हेंबर,१९८३. पृ.५१.

१९ - तत्रैव - पृ.५३.

२० - तत्रैव - पृ.५५.

२१ सौ.शांताबाई कृ.कांबळे - उ.नि. पृ.१२१.

२२ - तत्रैव - पृ.१२३.

२३ - तत्रैव - पृ.१२३.

२४ गो.म.कुलकर्णी - दलित साहित्य : प्रवाह आणि प्रतिक्रिया
प्रकाशक : अरुणा वि.पारगांवकर,
प्रतिमा प्रकाशन, पुणे,प्रथमावृत्ती-१३-१-८६ पृ.४१.

२५ मुक्ता सर्वगोड - उ.नि. पृ.७३,७४.

२६ - तत्रैव - पृ.९६.

२७ - तत्रैव - पृ.९६.

२८ गो.म.कुलकर्णी - दलित साहित्य :प्रवाह आणि प्रतिक्रिया - पृ.१८६.
प्रतिमा प्रकाशन,पुणे,प्रथमावृती,१३-१-१९८६.

२९ सौ.शांताबाई कृ.कांबळे - `माझ्या जन्माची चितरकथा` सुगावा प्रकाशन,पुणे, द्वितीय आवृती, ६ डिसेंबर,१९९०. पृ.२६.

३० मुक्ता सर्वगोड - `मिटलेली कवाडे`, चेतश्री प्रकाशन, अमळनेर, प्रथमावृती, ५ नोव्हेंबर,१९८३. पृ.१९.

३१ - तत्रैव - पृ.२३.

३२ सौ.शांताबाई कृ. कांबळे - उ.नि. पृ.१७.

३३ - तत्रैव - पृ.७.

३४ - तत्रैव - पृ.७.

३४(अ) तत्रैव पृ.१५

३५ - तत्रैव - पृ.१०.

३६ मुक्ता सर्वगोड - उ.नि. पृ.१६.

३७ - तत्रैव - पृ.१८.

३८ - तत्रैव - पृ.१९.

३९ सौ.शांताबाई कृ.कांबळे - उ.नि. पृ.८.

४० - तत्रैव - पृ.६३.

४१ - तत्रैव - पृ.३५.

४२ मुक्ता सर्वगोड - उ . नि. पृ.२४.

४३ - तत्रैव - पृ.२४.

४४ - तत्रैव - पृ.२०.

४५ - तत्रैव - पृ.४४.

४६ मुक्ता सर्वगोड - ` मिटलेली कवाडे `, चेतश्री प्रकाशन, अमळनेर, प्रथमावृती, ५ नोव्हेंबर, १९८३. पृ. ७२.

४७ - तत्रैव - पृ. ८३.

४८ सौ. शांताबाई कृ. कांबळे - ` माझ्या जल्माची चित्तरकथा ` सुगावा प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृती, ६ डिसेंबर, १९९०. पृ. १९.

४९ - तत्रैव - पृ. ४५.

५० - तत्रैव - पृ. ४५.

५१ - तत्रैव - पृ. ४५.

५२ - तत्रैव - पृ. ४७.

५३ - तत्रैव - पृ. ४३.

५४ मुक्ता सर्वगोड - उ. नि. पृ. ४४.

५५ सौ. शांताबाई कृ. कांबळे - उ. नि. पृ. १४४.

५६ - तत्रैव - पृ. ३४.

५७ - तत्रैव - पृ. ११५.

५८ - तत्रैव - पृ. ५३.

५९ प्रा. डॉ. सौ. आरती कुसरे - कुलकर्णी, दलित स्वकथने : साहित्य रुप विजय प्रकाशन : सीताबर्डी, नागपूर-१२, प्रथमावृती : ३ जानेवारी, १९९१. प्रस्तावना.